# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन

गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ / कार्तिक २९, १९४७ शके

१०७ :- लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०२५ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (**MOIS**) या संगणक प्रणालीवर **ONLINE** पध्दतीने सोमवार, दिनांक १ डिसेंबर, २०२५ पासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

(२) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(३) लक्षवेधी सूचना संपूर्णत: ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येतील. ऑफलाईन (**OFFLINE**) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा **ONLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २० नोव्हेंबर, २०२५

डॉ.विलास आठवले,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद

..२/-

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य

(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

(४) मा.सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

(५) मा.सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी

(७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय

(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**

(९) एम.के.सी.एल. कक्ष **(MKCL)**